# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.01.2026** **वार:शनिवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज रोजगार मेळ्यात देशभरातल्या 61 हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्र प्रदान करणार,
2. पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा समारोप; पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद
3. गुरू तेगबहादूर यांच्या स्मरणार्थ नांदेड इथं आजपासून भव्य हौतात्म्य सत्संग सोहळा
4. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रम आणि
5. न्यूझीलंडविरुद्धचा 20 षटकांचा दुसरा सामना जिंकून भारताची मालिकेत 2-0 अशी आघाडी.

**रोजगार मेळा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज 18 व्या रोजगार मेळ्यात विविध सरकारी विभाग आणि संस्थांमध्ये नव्याने नियुक्त झालेल्या 61 हजार जणांना दूरस्थ पद्धतीनं नियुक्तीपत्रांचं वाटप करणार आहेत. या कार्यक्रमामध्ये ते मार्गदर्शनही करतील. हा रोजगार मेळा देशभरात 45 ठिकाणी होणार आहे. पुण्यात तळेगाव इथं होणाऱ्या रोजगार मेळ्याला केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार आहेत.

**मन की बात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या सकाळी 11 वाजता आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा 130 वा भाग असेल.

**पुणे ग्रँड टूर**

'बजाज पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेचा काल समारोप झाला. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया, राज्य शासन आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं. स्पर्धेत सायकलपटूंनी आपली ताकद, सहनशक्ती आणि कौशल्य दाखवून प्रेक्षकांची मनं जिंकली. कालच्या चौथ्या आणि अंतिम टप्प्यात बल्गेरियाच्या ष्णरक्यो अलिकस्येई यानं सुवर्णपदक पटकावलं तर ऑस्ट्रेलियाचा स्कॉट कॅमेरॉन याने रौप्यपदक पटकावलं. चीनच्या ली लिन स्टार संघाचा न्यूझीलंडचा सायकलपटू मडग्वे लूक हा यलो जर्सीचा मानकरी ठरला. तर अवघ्या दहा सेकंदाच्या फरकाने बीटल्स कार्टर हा ऑस्ट्रेलियाचा सायकलपटू उपविजेता ठरला. भारतीय गटात हर्षवीर सिंग सेखोय ब्ल्यू जर्सीचा मानकरी ठरला. तर मानव सरदा भारतीय गटात दुसऱ्या स्थानी राहिला.

तत्पूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या स्पर्धेच्या अंतिम टप्प्याला म्हाळुंगे-बालेवाडी इथल्या श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलमध्ये सुरुवात करण्यात आली. या स्पर्धेमुळे पुणे जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर पोहोचले असल्याचे प्रतिपादन पवार यांनी यावेळी केले. गेले पाच दिवस पुण्यात झालेल्या या आंतरराष्ट्रीय स्पर्धेबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**महाराष्ट्राच्याच नाही तर देशाच्या क्रीडा विश्वात पुणे ग्रँड टूरने एक नवा मैलाचा दगड रचला आहे. एकेकाळी 'सायकलींचं शहर' म्हणून ओळख असलेलं पुणे, बदलत्या काळात ती ओळख हरवून बसल. मात्र 'पुणे ग्रँड टूर'मुळे पुण्याने पुन्हा एकदा आपला हा लौकिक मिळाला. 437 किलोमीटर अंतराची ही भव्य शर्यत चार टप्प्यांत पार पडली. प्रत्येक टप्प्यावर नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. रस्त्यांच्या दुतर्फा उभे राहून नागरिकांनी**

**खेळाडूंना दिलेलं प्रोत्साहन हे या स्पर्धेचं आणखी एक मोठं वैशिष्ट्य ठरलं. 35 देशांतील तब्बल 165 आंतरराष्ट्रीय सायकलपटूंनी गेल्या पाच दिवसांत पुणे जिल्ह्यातील रस्ते, डोंगरमाथे, घाट, अवघड वळणं आणि चढउतार अनुभवत ही ऐतिहासिक शर्यत पूर्ण केली. ही स्पर्धा केवळ शहरापुरती मर्यादित न राहता, ग्रामीण भागातील छोटी खेडी, पाड्या आणि वाड्यावस्त्यांपर्यंत पोहोचली. त्यामुळे पुणे ग्रँड टूरने जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यात आपल्या पाऊलखुणा सोडल्या. या स्पर्धेच्या निमित्ताने पुणे जिल्ह्यातील केवळ ग्रामीण पर्यटनाला चालना मिळाली नाही, तर पुणे थेट जागतिक क्रीडा नकाशावर अधोरेखित झालं. हे या शर्यतीचं पहिलंच वर्ष असलं, तरी दरवर्षी पुण्यात ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा रंगणार आहे. हाच उत्साह, ही उमेद आणि ही ऊर्जा पुढच्या वर्षीपर्यंत क्रीडा क्रीडा विश्वाला चैतन्यमय ठेवेल, यात शंका नाही. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी सीमा चोरडीया, पुणे.**

**दावोस**

स्वित्झर्लंडमधील दावोस इथल्या जागतिक आर्थिक परिषदेत राज्य सरकारनं 37 लाख कोटी रुपयांचे विक्रमी सामंजस्य करार केले असून हा दौरा शंभर टक्के यशस्वी ठरल्याचा दावा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केला आहे. ते काल मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या गुंतवणुकीमधून राज्यात 43 लाख रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**हिंद दि चद्दर**

श्री गुरु तेगबहादूर साहिबजी यांच्या 350 व्या शहीदी वर्षानिमित्त आज आणि उद्या नांदेडच्या मोदी मैदानावर हौतात्म्य सत्संग सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह देशातल्या अनेक राज्यांचे मुख्यमंत्री तसंच अनेक मान्यवर या सोहळ्यासाठी नांदेड इथं येणार आहेत. या अनुषंगाने आज सकाळी तख्त सचखंड श्री हुजूर साहिब गुरुद्वारा ते मोदी मैदान पर्यंत मिरवणूक काढण्यात येणार असून त्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. काल झालेल्या विशेष कीर्तन सोहळ्यात 350 शालेय विद्यार्थ्यांनी एका सुरात श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या 'शब्द गुरबानी'चे गायन करून अनोखी स्वरांजली अर्पण केली. आजच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर नांदेड तालुक्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

**ठाकरे जयंती**

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बाळासाहेब ठाकरे यांना आदरांजली अर्पण केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी समाजमाध्यमांवर बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. हे वर्ष बाळासाहेब ठाकरे यांचं जन्मशताब्दी वर्ष असून त्यानिमित्त विविध लोकाभिमुख उपक्रम राबवण्यात येतील असं शिंदे यांनी पत्रकार परिषदेत सांगितल. राज्यातल्या 29 महापालिका आणि 394 नगर परिषदांमध्ये 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान' राबवण्यासाठी नगर परिषदांना 1 कोटी आणि महापालिकांना 3 कोटी रुपये निधी देणार असल्याचं, शिंदे यांनी सांगितलं. मुंबई महानगरपालिकेतर्फे आरोग्य आपल्या दारी ही मोहीम राबवण्याची घोषणा शिंदे यांनी केली. तसंच राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे-एसटी संगे तीर्थाटन' योजना सुरू करण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली. या योजनेत महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना 50 टक्के सवलत तर 75 वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा मिळणार आहे. कालपासून राज्यातील 251 आगारांतून ही योजना एकाचवेळी राबविण्यात येत आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनीही बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन केलं.

**बोस जयंती-शेळके पुरस्कार**

थोर स्वातंत्र्यसेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 129 व्या जयंतीनिमित्त त्यांना काल देशभरात अभिवादन करण्यात आलं. नेताजींची जयंती पराक्रम दिवस म्हणून साजरी केली जाते. या निमित्त केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सुभाषचंद्र बोस आपत्ती व्यवस्थापन पुरस्कारासाठी यंदा अहिल्यानगर जिल्ह्यातील गाडीलगाव इथल्या लेफ्टनंट कर्नल सीता शेळके यांची

निवड झाली आहे. केरळमधे वायनाड इथं 2024 मधे भूस्खलनामुळे ओढवलेल्या आपत्तीत शेळके यांनी अभियांत्रिकी कौशल्याच्या सहाय्याने बचाव कार्यात लक्षणीय योगदान दिलं होतं. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे वडील अशोक शेळके आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले...

**माझी मुलगी सीता अशोक शेळके लेफ्टनंट कर्नल नेताजी सुभाषचंद्र बोस हा केंद्र शासनाचा जो पुरस्कार जाहीर झालेला आहे. त्याबद्दल आम्हाला फार मोठा अभिमान आहे. तिनं त्यामुळं आमच्या घराण्याचं गावाचं आणि सर्वांचं नाव उज्ज्वल केलेलं आहे अशाच प्रकारे तिने देशाची सेवा करावी वायनाडमध्ये काम केल्यामुळे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत त्याबद्दलसुद्धा मी तिचं अभिनंदन करतो.**

**पंढरपूर**

वसंतपंचमीनिमित्त पंढरपूरमधल्या विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विठ्ठल आणि रुक्मिणी मातेचा शाही विवाह सोहळा काल उत्साहात पार पडला. वसंत पंचमीनिमित्त काल ठिकठिकाणी सरस्वती पूजनही करण्यात आलं.

**क्रिकेट**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला रायपूर इथं काल झालेला 20 षटकांचा दुसरा क्रिकेट सामना भारताने 7 गडी राखून जिंकत मालिकेत 2-0 अशी आघाडी घेतली आहे. प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडने 207 धावा केल्या. ईशान किशनच्या 32 चेंडूतील तडाखेबंद 76 आणि कर्णधार सुर्यकुमार यादवच्या 37 चेंडूतील 82 आणि शिवम दुबेच्या 18 चेंडूतील 36 धावांच्या जोरावर भारताने हे आव्हान केवळ 92 चेंडूत सहज पार केले. या सामन्याद्वारे भारताने आतापर्यंत सर्वात जास्त धावांचा पाठलाग केला आहे. ईशान किशनला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात गरमीचा चटका वाढत आहे. उद्या सकाळपर्यंत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.